# नि. क्र. २४ वरील आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३, ५ व ६ यांनी त्यांच्या विरूध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द करून त्यांची कैफियत स्विकारण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावर दाखल केलेले म्हणणे वाचले. प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. पी.एम. कात्रजकर व वादीतर्फे विद्वान वकील श्री. एच.एन. डोके यांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादी हे मोल मजुरीसाठी बाहेर गावी गेलेले असल्याने ते तारखेला हजर राहु शकले नाहीत. तसेच, ते आपल्या वकीलांना फोन करू शकले नाहीत. त्यामुळे, प्रतिवादींना वेळेमध्ये त्यांची कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. तरी, दाव्याचा गुणदोषांवर निकाल लागण्याच्या दृष्टीने प्रतिवादींची कैफियत दाखल करून घेणे न्याय व जरूरीचे आहे. प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जासोबत दाव्याची कैफियत व नि. क्र. ५ वरील मनाई अर्जास म्हणणे दाखल केले असून, ते स्विकारण्याची विनंती केली.

४. याउलट वादीतर्फे प्रस्तुत अर्जास विरोध करून युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जामध्ये खोटया आशयाचा मजकुर नमूद केलेला असून, अर्जामध्ये नमूद केलेली कारणे संयुक्तीक नाहीत. करीता, प्रस्तूत अर्ज प्रतिवादींवर जास्तीत -जास्त खर्च लावुन नामंजुर करण्याची विनंती केली.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, वरील नमूद प्रतिवादींनी विहित वेळेमध्ये त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल केली नसल्याने नि. क्र. १ वरील दिनांक २९/०६/२०१९ रोजीच्या आदेशानुसार त्यांच्या विरूध्द विना कैफियतचा आदेश पारित करण्यात आलेला आहे. दाव्याचे स्वरूप व प्रस्तूत अर्जातील तथ्य विचारात घेता तसेच, नैसर्गिक न्याय तत्वानुसार उभय पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्यासाठी पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. तसेच, दाव्याचा निकाल गुणवत्तेवर लागण्याच्या दृष्टीने प्रस्तूत अर्ज मंजुर करून प्रतिवादींना त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य व उचित होईल. तथापी, प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे व कैफियत वेळेमध्ये दाखल न केल्याने

प्रस्तूत प्रकरण पुढे चालविण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य व न्यायोचित होईल. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज नि. क्र. २४ खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३,५ व ६ यांच्या विरूद्ध झालेला विना कैफियत आदेश रक्कम रू. ५ 00/- चा खर्च वादीला देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

Rajnikant Shesherao Jagtap

Digitally signed by Rajnikant Shesherao Jagtap
Date: 2021.09.16 16:46:33 +0530

दिनांकः १६/०९/२०२१.

(रजनिकांत शे.जगताप)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**जामखेड जि. अ.नगर.**